प्रेस नोटस दि.17/04/2026

# पाचोरा पोलीसांची धडाकेवाज कारवाई दोन चोरीचे गुन्हे तीन तासात उघड व मुद्देमाल हस्तगत

दिनांक 16/4/2026 रोजी नय्युम जहांगिर देशमुख व्यवसाय इलेक्ट्रीक दुकान रा.आक्सानगर जारगाव ता.पाचोरा यांच्या अक्सानगर जारंगाव येथील गोडावुन मधुन 94500/-रुपये किमतीचे तीन गोदरेज कंपनीचे ए.सी. कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी दिनांक 01/4/2026 रोजी दुपारी 12.00ते दिनांक 14/4/2026रोजी दुपारी 16.00वाजेच्या दरम्यान चोरुन नेले होते. सदर बाबत पाचोरा पोलीस स्टेशनला फिर्याद दिल्यावरुन पाचोरा पोलीस स्टेशनला गुन्हा रजि.नं. 177/2026 भारतीय न्याय संहिता 2023चे कलम 303(2)प्रमाणे गुन्हा दाखल झाल्यावर मा.पोलीस अधिक्षक माहेश्वर रेड्डी सो. जळगाव , मा अपर पोलीस अधिक्षक श्रीमती कविता नेरकर मॅडम, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी बापु रोहम सो। यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री राहुलकुमार पवार, पाचोरा पोलीस स्टेशन ,गुन्हे शोध पथकातील ,सफौ/45 विलास पाटील, पोहेकॉ/1058 वसीम शेख, पोहेकॉ/श्रीकात गायकवाड ,पोकॉ/1230योगेश पाटील, पोकॉ/990संदीप राजपुत, पोकॉ.3263 गणेश कुंवर नेम.पाचोरा पोलीस यांनी गुन्ह्यांचे गार्भीय लक्षात घेवुन तातडीने तपास चक्रे फिरवुन गोपनीय माहीती काढुन आरोपी रिहान हमीश शहा वय 22 रा.हनुमानगर पाचोरा ता.पाचोरा जि.जळगाव -हा निष्पन्न करुन त्यास लागलीच ताब्यात घेवुन बौध्दीकौशल्य वापरुन आरोपी रिहान हमीश शहा वय 22 रा.हनुमानगर पाचोरा ता.पाचोरा जि.जळगाव याने गुन्हा केल्याची कबुली दिल्यावरुन त्यांच्याकडुन गुन्ह्यांत चोरीस गेलेली मुद्देमाल 94500/-रुपये किमतीचे तीन गोदरेज कंपनीचे ए.सी. हस्तगत केले आहे.त्याप्रमाणे पाचोरा पो.स्टे.गुन्हा रजि.नं. 174/2026 भारतीय न्याय संहिता कलम 303(2) प्रमाणे दि.15/4/2026 रोजी दाखल गुन्ह्यांत 30,000/- रु.सोन्यांची पोत चोरीचा गुन्हा असे दोन्ही गुन्हे पोलीसांनी दाखविलेली तत्परता व तीन तासात दोन्ही गुन्ह्यात गेलेला संपुर्ण मुद्देमाल हस्तगत केल्याने संबंधीत फिर्यादी व परीसरातील जनतेने पोलीस दलाचे मुक्तकंठाने कौतुक करुन कर्तव्यविष्ठ पोलीसांचे आभार मानले आहे.असुन गुन्हेगारी करणारे या गुन्हेगारांवर वेळीच वचक बसविला आहे.


MADE IN INDIA
Inverter
CONDITIONER